भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. १०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०२/२०१७

**१) संगनमत करून तु माझ्या मुलीची जिंदगी खराब केली असे बोलुन शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:—**

दिनांक १०/०२/२०१७ चे २१.०० दरम्यान. यातील फिर्यादी ही आपल्या घरी ऐकटीच हजर असतांना आरोपी क्र. १,२,३ व ४ हे फिर्यादीचे घरी आले व आरोपी क्र. १ हीने फिर्यादीला तु माझ्या मुलीची जिंदगी खराब केली व माझ्या जावई सोबत तुझा लफडा आहे असे म्हणुन माझी मुलगी माझे घरी येत नाही असे बोलल्याने यातील आरोपीतांनी शिवीगाळ करून मारण्यापीटण्याची धमकी दिल्याने व फिर्यादीला लाथा बुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा भजने हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणे व हयगयीने घडक देवुन जखमी केल्याने गुन्हा नोंद. . :—**

दिनांक ११/०२/२०१७ चे १३.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी अमीत नामदेव लाडे वय २६ वर्ष रा. पॉलीटेक्नीक कॉलेज सेंदुरवाफा हा आपले नवीन मोटार सायकल पॅशन एस. प्रो नागझीरा रोडने नी एनएच ०६ रोड क्रॉस करित असतांना सेंदुरवाफा कडुन येणारी मोटार सायकल आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकल निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला घडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७, भांदवी. सहकलम १८४, १३४,/१८७ (अ) ब मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बागळे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) जागेच्या वादावरून जखमीच्या डोक्यावर बांबुच्या काठीने मारून शिवीगाळ करून मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद. . . :—**

दिंनाक ११/०२/२०१७ रोजी ०८.३० वा. दर. यातील जखमी संजय सुर्यवंशी व आरोपी शेजारी राहत असुन त्याचे घरासमोरील जागेबद्धल वाद असुन त्या कारणावरून आरोपी हा जखमीचे घरासमोरील झाड तोडत असतांना जखमीचे झाड का तोडलास म्हणुन हटकले असता आरोपी क्र. ०१ ने बांबुच्या काठीने डोक्यावर मारून जखमी केले व आरोपी क्र. ०२ हा फिर्यादी व जखमी यास मारण्यास धावुन शिवीगाळ करून मारण्या पीटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी दिलीप देवरामजी सुर्यवंशी वय ४६ वर्ष रा. आमगाव दिघोरी तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे ३२४,५०४,५०६ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास स.फौ. गौर पो. स्टे. कारधा हे करीत आहे.

**४) संगनमत करुन तोंडातोंडी भांडण करून व गोटयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद. . . :—**

दिंनाक १०/०२/२०१७ रोजी २३.०० वा. दर. यातील फिर्यादी व त्याचे मित्राचे बहिनीचे लग्नमंडपाचे कार्यक्रम असल्याने फिर्यादी तेथे गेला तर आरोपी क्र. १ सोबत तोंडा तोंडी भांडण केल्याने आरोपीचे मित्रांनी संगनमत करून थापड बुक्यांनी व गोटयाने डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी निखीलेश सुरेंद्र राजाभोज वय २९ वर्ष, रा. विदर्भ हाउसींगबोर्ड तकीया वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे ३२४,३४ भांदवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि चाबुकस्वार पो. स्टे. भंडारा हे करीत आहे.

**५) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे दोन व्यक्ती जखमी केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १०/२/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान. यातील आरोपी मोटार सायकल चालक हा कामावरून घरी परत येत असतांना त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने निष्काळजीपणे व हयगयीने चालवुन मिटेवानी कडुन बिसराम मन्साराम सोनवाने वय ४५ वर्ष रा. मिटेवानी पायी चालत असतांना यास घडक देवुन गंभीर जखमी करण्यास व स्वता: व त्याचे मोटार सायकल वर मागे बसलेल्या राकेश मुन्ना पटले वय १८ वर्ष रा. मिटेवानी यास गंभीर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि सोनपीपरे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**६) गोटयातील बांधुन ठेवलेल्या बकऱ्याची चोरी . :—**

दिनांक १०/०२/२०१७ चे २२.०० ते ११/०२/२०१७ चे ०५.०० वा. दरम्यान. यातील फिर्यादी कुंडलीक तुकाराम ढेंगेवय ७८ वर्ष रा. विहीरगाव याने आपल्या घराचे गोटयात बांधुन ठेवलेले ०२ खैऱ्या रंगाचे बकरे किंमती ८,०००/—रू. चे कोणीतरी अज्ञात चोराने सुनामौका पाहुन चोरून नेल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ३८० भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा निरगुडे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**७) ग्रामपंचायतचे सार्वजनिक विहीरीत उडी मारून बुडुन मरण पावलयाने मृत्यु. :—**

दिनांक ११/०२/२०१७ चे ०६.०० वा. दरम्यान. यातील मृतक हा दारूचे नशेत ग्रामपंचायतचे सार्वजनिक विहीरीत उडी मारून पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.फौ. उईके पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**८) अवैध दारु अडयांवर धाडी . :—**

दिनांक ११/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो. स्टे. तुमसर,सिहोरा,गोबरवाही, लाखणी, येथील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ४ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारु सडवा+साहित्य किंमती १,७००/—रु. व १२ लीटर ४२० मिली लिटर देशी दारु किंमती ३४५०/—रु. असा एकुण किंमती ५,१५०/—रू. चा माल जप्त करण्यात आला आहे.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ११/०२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ९० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ७८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

सपोनि. कें. एम.हत्तीमारे
जि. वि. शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९४२२८३२१७८

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.